MHNG130012152022

Judge Code: MH02592.

संक्षिप्त फौजदारी खटला क्र.७१८/२०२२

सरकार वि. रामलाल

**नि.१० खाली**

## न्यायनिर्णय

(दिनांक १० मे, २०२३ रोजी घोषित)

आरोपीविरूध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५ (ई) अन्वये खटला पोलीस अधिकारी, राज्य उत्पादन शुल्क, सिमा तपासणी नाका, कांद्री (मनसर), ता. रामटेक, जि. नागपूर तर्फे दाखल करण्यात आला आहे.

२. या न्यायालयाने आरोपीविरूध्द निशानी क्रं.१० खाली महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) प्रमाणे दोषारोप निश्चित केले.

३. आरोपीला त्याचेविरुध्द नोंदविण्यात आलेला संपरिक्षा अभिलेख मराठीतुन समजावुन सांगण्यात आला असता त्याने गुन्हा कबुल नसल्याचे सांगितले. त्याप्रमाणे आरोपीविरुध्द खटला चालविण्यात आला. अभियोगपक्षाने घेतलेल्या पुराव्यामध्ये आरोपीविरुध्द कोणताही पुरावा आला नाही त्यामुळे आरोपीचा फौजदारी प्रक्रीया संहिता कलम ३१३(१)(ब) प्रमाणे जबाब नोंदविण्यात आला नाही.

४. अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील ए.आर. काळे आणि आरोपीतर्फे वकील वाय.एस. डोंगरे यांचे युक्तीवाद ऐकले.

५. सदर खटल्यातील संपूर्ण पुरावा व कागदपत्रे पाहुन खालील प्रमाणे मुद्दे निर्धारीत केले व त्यास मी खालील नमुद कारणास्तव समोर दर्शविलेल्या निष्कर्षाप्रत पोहचले :

| अ.क्र. | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | दिनांक २७.०८.२०२१ रोजी १९.३० ते २०.३० वाजताचे दरम्यान तुमडीटोला, ता. रामटेक येथे आरोपीने त्याच्या ताब्यात ४० लिटर मोहाफुल गावठी दारु अवैधरित्या बाळगल्याचे अभियोगपक्षाने सिध्द केले काय ? | ...नाही. |
| २ | काय आदेश ? | आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात आले. |

## <u>कारणमिमांसा</u>

**६.** आरोपीवर ठेवण्यात आलेले आरोप सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने केवळ एका साक्षीदाराला तपासले.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | रमेश क्रिष्णा मरस्कोल्हे | (सा.क्र.१) | पंच साक्षीदार |

**<u>मुद्दा क्र. १ बाबत</u> :–**

**७.** रमेश (सा.क्र.१) हा पंच साक्षीदार आहे. त्याने त्याचे पुराव्यात असे सांगितले की, दिनांक २७.०८.२०२१ रोजी राज्य उत्पादन शुल्क, सिमा तपासणी नाका, कांद्री (मनसर) येथील अधिका–यांनी त्याला कुठेही बोलविले नव्हते. त्याची सही कार्यालयात घेतली होती. राज्य उत्पादन शुल्क, सिमा तपासणी नाका, कांद्री (मनसर) येथील अधिका–यांनी त्याच्या समक्ष काहीही जप्त केले नव्हते. तसेच त्याने घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावर त्याच्या सहया मान्य केल्या. परंतू त्यातील मजकुर माहीत नसल्याचे कथन केले. पंच साक्षीदाराने अभियोगपक्षास सहकार्य न केल्याने सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदाराला उत्तरसुचक प्रश्न विचारले, परंतु त्याने अभियोगपक्षास सहकार्य होईल असे कुठलेही कथन केले नाही.

८. अभियोगपक्षाने सादर केलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, पंच साक्षीदार रमेश याने त्याचे समक्ष पोलीसांनी आरोपीकडुन काहीही जप्त केले नाही व कोणताही घटनास्थळ/जप्ती पंचनामा तयार केला नाही असे कथन केले. सदर प्रकरणात घटनास्थळ/जप्ती पंचनामा हा पंच साक्षीदारामार्फत सिध्द झालेला नाही. जप्ती पंचनामा पंच साक्षीदारामार्फत सिध्द न होणे ही महत्वाची त्रुटी सदर प्रकरणात आहे.

९. सदर प्रकरणात रासायनिक विश्लेषण अहवाल दाखल असला तरी स्वतंत्र पंच साक्षीदाराने त्याचेसमक्ष आरोपीच्या ताब्यातुन काहीही जप्त केल्याचे नाकारल्याने सदर अहवाल आरोपीचे ताब्यातुन जप्त केलेल्या पदार्थाचाच आहे हे अभियोगपक्षाने सबळ पुरावा देवुन सिध्द केलेले नाही. त्यामुळे अभिलेखावर असलेला पुरावा हा आरोपीविरुध्दचा दोषारोप सिध्द करण्यास पुरेसा नाही. त्यामुळे आरोपी हिला संशयाचा फायदा मिळण्यास पात्र ठरते. सबब मी मुद्दा क्रमांक १ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवुन मुद्दा क्रमांक २ करिता खालील आदेश पारित करित आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपी **रामलाल गंगाराम उईके** याला फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई) च्या गुन्हयातुन दोषमुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचे जामिन बंधपत्र व जामिन कदबा रद्द करण्यात येत आहे व आरोपीच्या जमानतदाराला मुक्त करण्यात येत आहे.

३. जप्त मुद्देमाल मोहाफुल गावठी दारु हि नाशवंत असल्याने त्याबाबत स्वतंत्र ओदश नाही. तसेच जप्त मुद्देमालातील एक प्लास्टीक कॅन हे विनामुल्य असल्याने त्यांचा अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नाश करण्यात यावा.

**४.** आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७–अ च्या पुर्ततेसाठी नव्याने रु.१५,०००/–चे वैयक्तीक बंधपत्र दाखल करावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला).

सही/–

रामटेक
दिनांक : १०.०५.२०२३

**( डिंपल संतोष सैंदाणे )**
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,
कोर्ट नं.२, रामटेक.

ENDORSEMENT

| | | |
|---|---|---|
| Case argued on | : | 10.05.2023 |
| Order dictated on | : | 10.05.2023 |
| Transcription ready on | : | 10.05.2023 |
| Order checked and signed on | : | 10.05.2023 |

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file are word to word same as per original judgment.

Name of Steno :- V.P. Ghanwat (Gr.III)